# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब सादर करण्याबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी महाविद्यालय/संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/संस्थेस चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आयोजन तसेच उपकरणे, क्रीडा साहित्य, सौर ऊर्जा उपकरणे खरेदी याकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे.

गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत केंद्रीय पध्दतीने खालीलप्रमाणे हिशेब स्वीकारण्यात येणार आहेत.

| जिल्हा/शहर | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| नाशिक | ५/०३/२०१९ | ९ ते ५ | विद्यापीठ उपकेंद्र नाशिक |
| अहमदनगर | ६/०३/२०१९ | १० ते ५ | बीपीएचई सोसायटीचे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज करिअर डेव्हलपमेंट रिसर्च, आयएमएस कॅम्पस, स्टेशन रोड, अहमदनगर |
| पुणे जिल्हा (ग्रामीण) | ८/०३/२०१९ | ९ ते ५ | पर्यावरणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. |
| पुणे शहर | ९/०३/२०१९ | ९ ते ५ | |

महाविद्यालय/संस्थेने गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रिय हिशेब तपासणी शिबीर वर नमूद केलेल्या ठिकाणी देयके सादर करीत असताना खालीलप्रमाणे काळजी घेण्यात यावी.

१. विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र. वित्त/२०१८-१९/१७७१ दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून त्यासोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणेच (Check List) महाविद्यालय/संस्थांनी संबंधित खर्चाचे लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले हिशेब मूळ देयकांसह तयार करुन अर्थसहाय्य प्राप्तीसाठी सादर करावेत.

२. नोंदणीची (Registration) वेळ ही दुपारी १ पर्यंतच राहील त्यानंतर आलेल्या हिशोबांची नोंदणी केली जाणार नाही.

३. सादर करण्यात येणाऱ्या हिशेबाचा धनादेश कोणत्या नावाने हवा हे (Check List) मध्ये नमूद करण्यात यावे.

४. महाविद्यालयांचा हिशेबामध्ये हिस्सा असल्याने लेखा परिक्षणासाठी विद्यापीठाकडे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांची प्रत महाविद्यालयास आवश्यक असल्यास नोंदणी (Registration) करण्यापूर्वी हिशेबाची छायांकित प्रत काढून ठेवण्यात यावी.

वरील सूचनांचे पालन करण्यात यावे.

ABBedarkar 28/02/19

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/ १८०७
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

**सीए अतुल पाटणकर**
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.